# बृहन्मुंबई महानगरपालिका

( **घनकचरा व्यवस्थापन आर/उत्तर विभाग** )

क्र. सहा. अभि. / घकव्य / 1674 / आर/उत्तर दि. 13.06.2024

## जाहिरात

## "सखोल स्वच्छता मोहिम"

विषय:- आर/उत्तर विभागात 'सखोल स्वच्छता मोहिम' राबविण्याबाबत.

आर/उत्तर विभाग घन कचरा व्यवस्थापन खात्यामार्फत **"सखोल स्वच्छता मोहिम"** राबविण्याकरीता नव्याने संस्थाची नेमणूक करण्याकरीता आर/उत्तर विभाग कार्यालयाच्या कार्यक्षेत्रात कार्यरत इच्छुक शासकीय नोंदणीकृत स्थानिक संस्था उदा. कामगार सहकारी संस्था/ सहकारी सेवा संस्था/ अशासकीय संस्था / बेरोजगार संस्था (या सर्व संस्थांचा स्थापनेचा उद्देश त्यांच्या सभासदांना रोजगार मिळविणे हा असावा )यांच्यामार्फत रस्ते व पदपथांच्या सफाईसाठी दि**. 01.07.2024** ते दि**. 30.11.2024** या **5** महिन्यांच्या कालावधी करिता मोहोरबंद ईच्छापत्र मागवित आहोत**.**

| अनु. क्र. | योजनेचे नाव | कामाकरीता निवड करावयाच्या संस्था |
|---|---|---|
| 1 | **"सखोल स्वच्छता मोहिम"** | **04** संस्थाच्या (**39** एकक) |

अर्जाचा नमुना आणि सखोल स्वच्छता मोहिम बाबतची नियमावली, आर/उत्तर विभाग कार्यालयातील सहाय्यक अभियंता (घन कचरा व्यवस्थापन) यांच्या कार्यालयात दि. 15.06.2024 ते दि.21.06.2024 या कालावधीत, सकाळी 10.30 ते दुपारी 4.00 यावेळेत मिळु शकेल. पात्र संस्थांच्या यादी मधुन सोडत काढण्यात येइल. सदर सोडती मध्ये यशस्वी झालेल्या संस्थांना कामाचे वाटप, विभागाचे सहाय्यक आयुक्त, योजनेच्या नियमावलीतील नमुद केलेल्या अटी व शर्तीनुसार करतील कामाचा कालावधी दि. 01/07/2024 ते दि.30/11/2024 या **5 महिन्यांच्या** कालावधीकरिता किंवा प्रमुख अभियंता (घ.क.व्य.) कार्यालया मार्फत सदर योजना राबविण्याबाबत नव्याने निर्देश देण्यात येतील, त्यानुसार संस्थांनी स्वच्छतेचे काम करावे लागेल.

इच्छूक संस्थांनी अधिक तपशिल, अर्ज व शपथपत्राच्या नमुन्यासाठी आर/उत्तर विभाग घनकचरा व्यवस्थापन कार्यालयात संपर्क करावा किंवा महानगरपालिकेच्या http://portal.mcgm.gov.in या संकेत स्थळावर भेट द्यावी.

संस्थेने आर/उत्तर विभाग कार्यालयात अर्ज करण्याची अंतिम तारीख दि. 21.06.2024 (दुपारी 3.00 वाजेपर्यंत). नमूद केलेल्या कार्यालयीन कालावधी नंतर दाखल करण्यात आलेले अर्ज विचारात घेण्यात येणार नाहीत.

**सही/-**

**सहाय्यक आयुक्त 'आर/उत्तर' विभाग**